# नंबर १ मराठी ऑडिशन स्क्रिप्ट PDF |Marathi Audition Script PDF

## पूर्वकल्पना :

एका कंपनीत परमेश नावाचा सिक्युरिटी गार्ड (शिपाई ) काम करतोय, दररोजच्या पेक्षा आज काहीतरी वेगळा म्हणजेच की त्या कंपनीचा मालक कामाच्या वेळेच्या थोडं आधी घरी जायला निघालाय . दररोज वेळेत जाणाऱ्या आपल्या मालकाला रमेशने विचाराचे धाडस केलं की आज तुम्ही वेळेच्या आधी घरी जात आहे, सर्व काही ठीक आहे ना .

मालकाला सुद्धा त्या शिपायाबद्दल थोडा आपलेपणा वाटला आणि तो त्याची विचारपूस करू लागला.. .. .. आणि रमेश त्यांना जमेल तशी ,घाबरत -घाबरत उत्तर देऊ लागला .. आता पुढे..........

## पात्र :

रमेश (वय २७-३५ वर्ष )

## वेळ :

१ मिनिट ३० सेकंद

## Marathi script for audition | Marathi One-Act-Play Script

नमस्कार साहेब .. आज लवकर !! नाही म्हणजे तुम्ही रोज वेळेच्या आधी जात नाही म्हणून विचारल , घरी सगळ ठीक आहे ना.

मी कसला लवकर जातोय .. आपली ड्यूटी अजून संपलेली नाही .. हा आणि १२ तास संपले की लगेच घरी . बर या तुम्ही साहेब .

(साहेब बोलतात की तुझ्याशी बोलायच आहे .. तसा रमेश घाबरून )

माझ्याशी बोलायचय ..?

नाही म्हणजे माझ काही चुकल का .. पण काहीच केल नाही मी .. सकाळी पण लवकर आलोय , सगळी काम पण झालीत .. मग ? ? साहेब खरंच काही नाही ओ मी काही नाही केलय . (थोड्या वेळाने शांत होतो )

तुम्ही मला कामावरून काढून तर नाही टाकणार ना ? अस नका हो करू , मी हात जोडतो तुमच्यापुढे .

काय म्हणालात ? कामावरुन नाही काढणार ! मग ठीक आहे .. विचार विचारा काय विचारायच ते .

(साहेब घरच्याबद्दल विचारतात )

माझ्या घरी ! मी , बायको , आई-वडील , आणि छोटीशी मुलगी आहे .

(आर्थिक परिस्तिती बद्दल विचारतात )

काय करणार साहेब कुटुंब आहे म्हणजे जबाबदारी आहे आणि एकदा का जबाबदारी अंगावर आली की झटकून कस चालेल .. नाही का ? हा आता एवढ्याशा पगारात नाही भागत पण काराव लागत काय करणार .

एक विचारू का ? तुम्ही एवढ्या आपुलकिन विचारल तेवढंच खूप आहे माझ्यासाठी , नाहीतर आजकाल आमच्यासारख्या साध्या शिपायाला कोण विचारतय .

कधी कधी खूप पश्चयाताप होतो , का त्यावेळी शिकलो असतो तर आज चांगली नोकरी मिळाली असती . काय करणार घरी दोन वेळच अन्न नाही ते शिक्षणाच तर दूरच राहील. पण साहेब एक मात्र परिस्थितीने शिकवलय किती आणि काही ही झाल तरी खंबीर उभ राहायच .

(अडवांस पैसे पाहिजे असल्याचा अर्जा बद्दल विचारतात )

हो साहेब ते घरी वडिलांची तब्बेत बारी नाहीय , दवाखान्यात न्यायचय त्यासाठी च अर्ज केलाय . मी परत नाही मागणार .. ते आता जरा गरज होती.

(साहेब पैसे पुढे करतात...)

नाही साहेब एवढे नकोत .. मी जेवढे मागितले तेवढेच द्या.

साहेब गाडी आली तुमची , चला मी गाडीपर्यन्त सोडतो तुम्हाला .

**आम्हाला फॉलो आणि subscribe नक्की करा :**

**Instagram**

**Facebook**

**Youtube**